**महाराष्ट्र शासन**

**ग्रंथालय संचालनालय,** महाराष्ट्र राज्य, नगर भवन,

शहीद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१,**दुरध्वनी क्र.** :- (०२२) २२६६४६३८/२२६७१३३३

**संकेतस्थळ** - www.dol.maharashtra.gov.in **ई-मेल** :- director. dol@ maharashtra.gov.in

**निवेदन**

**शासकीय ग्रंथालयांसाठी सन २०२६-२८ ग्रंथखरेदीचे सूटदर (Book purchase Discount Rate) निश्चिती करणेबाबत.**

ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांसाठी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील पुढीलप्रमाणे निधीच्या उपलब्धतेनुसार खरेदी करावयाचे आहेत.

| अ.क्र. | विषय | भाषा | | |
|---|---|---|---|---|
| | | मराठी | हिंदी | इंग्रजी |
| १. | ललित | | | |
| २. | सर्वसामाजिक शास्त्रे | | | |
| ३. | बालवाङ:मय | | | |
| ४. | स्पर्धा परीक्षा विषयक ग्रंथ | | | |
| ५. | सर्व प्रकारचे संदर्भ ग्रंथ | | | |
| ६. | शासकीय प्रकाशने | | | |
| ७. | नवसाक्षरांसाठीचे साहित्य/ वाड्मयेत्तर | | | |

सदर संबंधित ग्रंथ विक्रेत्यांकडून,वितरकांकडून,प्रकाशनसंस्थेकडून ग्रंथांच्या मूळ किंमतीवर ग्रंथालय संचालनालय व संचालनालयाच्या अधिपत्याखालील राज्यातील शासकीय ग्रंथालयांकरिता ग्रंथपुरवठा करण्यासाठी किती जास्तीत जास्त सूट देऊ शकतील याबाबतचे सूट दरपत्रक मागविण्यात येत आहे.

सूट दरपत्रकासोबत पॅनकार्ड, मागील तीन वर्षाचे आयकर भरलेले विवरणपत्र, शॉप अॅक्ट लायसन्स किंवा कंपनी नोंदणी प्रमाणपत्र, शासकीय किंवा निमशासकीय व स्वयंसेवी शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांस ग्रंथपूरवठा केला असल्यास त्याचा पुरावा इत्यादींच्या साक्षांकित छायाप्रती सीलबंद पाकिटातून **दि. २२ मे २०२६** पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने **ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य,नगर भवन, शहिद भगतसिंग मार्ग, मुंबई-४०० ००१** यांचेकडे समक्ष वा पोस्टाने पाकीटावर "**ग्रंथ खरेदीवरील सुटदर २०२६-२८ (दोन वर्षाकरिता) दरपत्रक**" असे नमूद करुन पाठवावे. या तारखेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रक/ निविदा विचारात घेतल्या जाणार नाही.

विहित मुदतीत प्राप्त दरपत्रक/निविदा **दि. २६ मे २०२६** रोजी दुपारी ३.०० वाजता उघडण्यात येतील.त्यावेळी इच्छुकांनी स्वखर्चाने ग्रंथालय संचालनालय, नगर भवन, मुंबई येथे उपस्थित राहता येईल. मुदतीत प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी वरील विषयांकित ग्रंथांच्या छापील किंमतीवर तुलनात्मक दृष्टया ग्रंथ प्रकार निहाय जो जास्तीत जास्त सूटदर असेल तो चर्चेतून सर्वानुमते निश्चित केला जाईल. निश्चित करण्यात आलेले सूटदर ग्रंथालय संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय ग्रंथालयांना कळविण्यात येतील. तसेच संचालनालयाच्या **www.dol.maharashtra.gov.in,** या संकेतस्थळावर प्रसिध्द (upload) करण्यात येतील.

संचालनालयास प्राप्त झालेल्या सूटदरपत्रकाच्या आधारे ग्रंथखरेदीसाठी ग्रंथ विक्रेत्यांची किंवा ग्रंथ वितरकांची किंवा प्रकाशन संस्थांची निवड करण्यात येणार नसून विषय निहाय ग्रंथखरेदी सूटदर निश्चित करण्यात येणार आहे. याची संबंधितांनी नोंद घ्यावी. तसेच सूट दरपत्रक स्विकारणे वा कोणतेही कारण न देता कोणत्याही टप्प्यावर नाकारणे हे सर्व अधिकार ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय यांनी राखून ठेवले आहेत.

सन २०२६-२८ या वर्षाकरिता मान्य /निश्चित झालेले सूटदरानुसार कोणीही पुरवठादार शासकीय ग्रंथालयांना ग्रंथ पुरवठा करु शकतील.

**(अशोक मा. गाडेकर)**
**प्र.ग्रंथालय संचालक**

**मुंबई.**
**दि:-** ०८/०५/२०२६